# 'आत्मक्लेशा'चे शस्त्र परपीडेसाठी नसावे : परुळेकर

पुणे : प्रतिनिधी

'अहिंसा हा शब्द चांगला आहे, परंतु त्याचे संपूर्ण पालन करण्याची शक्ती फक्त महात्मा गांधी यांच्याकडेच होती. 'गांधीवाद' हा शब्द स्वीकारून ढोंगीपणापासून दूर जाता येत नाही. 'आत्मक्लेश' या शस्त्राचा वापरसुद्धा परपीडेसाठी करणे अयोग्य आहे, अशी टीका पत्रकार राजू परुळेकर यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे नाव न घेता केली.

भ्रष्टाचाराच्या मुद्यावर लढा देण्यात महाराष्ट्र आजही मागे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. स्वच्छ भारत, समर्थ भारत, समृद्ध भारत या अभियानातर्फे आयोजित कार्यक्रमात परुळेकर यांचे 'भ्रष्टाचारमुक्त समाज- क्रांतीची नवी दिशा' या विषयावर भाषण झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर पत्रकार विनय हर्डीकर, दिलीप जोशी, शशांक जेवळीकर उपस्थित होते.

'स्वच्छ, लोकाभिमुख बँकिंग' या विषयावर जोशी यांनी, तर 'कार्यक्षम आणि ग्राहकाभिमुख विद्युतपुरवठा' या विषयावर जेवळीकर यांनीही त्यांचे विचार व्यक्त केले.

'भ्रष्टाचाराविरुद्ध कोणताही कायदा करून क्रांती येईल हा भ्रम आहे. बदल घडविण्यासाठी क्रांतिकारक पद्धतीने मात्र सर्वच स्तरातील अभ्यासपूर्ण विचार करून सर्वांनीच त्यामध्ये सहभागी व्हायला पाहिजे. तरुणवर्ग म्हणजे केवळ आदित्य ठाकरे, ज्योतिरादित्य शिंदे, राहुल गांधी हे नव्हेत. त्यांना तळागाळापर्यंत काय चालले आहे हेच माहिती नसते, असे स्पष्ट करीत परुळेकर म्हणाले, भारताच्या उत्तरेकडील राज्यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलने मोठ्या प्रमाणात छेडलेली दिसतात, मात्र महाराष्ट्र अजूनही पवार, ठाकरे, मुंडे यांच्यातच अडकून पडला आहे. महाराष्ट्रात भ्रष्टाचाराविरुद्ध अधिक जनजागृती व्हायला पाहिजे, असेही परुळेकर म्हणाले.